कार्यालय पोलीस अधीक्षक

दिनांक ०३/०७/२०१७

दिनांक ०२/०७/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमीदाराचे खबरेवरुन मा. पोलीस अधिक्षक साो. गडचिरोली यांचे आदेशान्वये तसेच पोलीस निरीक्षक स्थागुशा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली नामे सचिन गोपीचंद जनबंधु यांचे तसेच संतोष हिरादास डाहाळे दोन्ही रा. चिखली ता. कुरखेडा जिल्हा गडचिरोली हे दोघे आपआपले घरी अवैधरित्या देशी दारु विक्रीकरीता बागळून ठेवून असल्याची मौजा चिखली येथील महिला दारुबंदी समिती कडून मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थागुशा येथील दारुबंदी पथकाने मौजा चिखली ता. कुरखेडा येथील नमुद दोन्ही आरोपीतांच्या घराची झडती घेतली असता आरोपीतांचे घरातुन देशी दारु सुप्रिम नंबर १ कंपनीच्या एकूण किंमत ११००/- रु. चा माल अवैधरित्या मिळून आल्याने दोन्ही आरोपीतांविरुध्द महा. दारुबंदी अधिनियम ६५ (ई) प्रमाणे पोस्टे कुरखेडा येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास चालु आहे. सदर कारवाई पोउपनि सुनिल इंगळे, पोहवा/प्रेमकुमार दुर्गे, नापोशि/नरोटे, पोशि/चवारे, मपोशि/साखरे, चापोशि/चौरे, यांनी पार पाडली.

